**महाराष्ट्र शासन**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१७ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

---

क्र:प्रविस्था-१२(२०२५)/परिपत्रक/नि.बदली-२०२५/का-१/ २२८ दिनांक : 2 3 JAN 2025

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५, शासन अधिसूचना दि.२५.५.२००६

२) शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्या.१२, दि.०९.४.२०१८

**परिपत्रक**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील आणि अधिनस्त कार्यालयातील सर्व अधिकारी यांच्या नियतकालिक बदल्यांबाबत, संदर्भ क्र.१ मधील शासन अधिसूचना दिनांक २५.५.२००६ नुसार बदल्यांचे विनियमन विषयक अधिनियम २००५ अन्वये नियतकालिक बदल्यांची कार्यवाही एप्रिल / मे २०२५ मध्ये करावयाची आहे. तसेच संदर्भ क्र.२ रोजीच्या शासन निर्णयान्वये गट-अ मधील अधिकारी वगळून गट-ब मधील अधिकारी यांना समुपदेशनाद्वारे बदलीचे धोरण लागू आहे.

**शासन अधिसूचना दिनांक २५.५.२००६ नुसार बदल्यांचे विनियमन विषयक अधिनियम २००५ मधील प्रकरण दोन, कलम ३(१) अन्वये सेवेतील अधिकारी यांच्याकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षाचा असेल. याच अधिनियमातील कलम ४(१) नुसार अधिकाऱ्यांच्या नेमणुकीचा पदावधी पुर्ण केल्याखेरीज अधिकाऱ्यांची बदली करता येणार नाही. कलम ४(२) नुसार सक्षम प्राधिकारी प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात, त्या वर्षी एप्रिल व मे महिन्यात बदलीसाठी पात्र होतील अशी शासकीय अधिकाऱ्यांची यादी तयार करेल, असे निर्देश आहेत.**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील आणि अधिनस्त कार्यालयातील गट-अ आणि गट-ब मधील सर्व अधिकारी यांच्या नियतकालिक बदल्यांबाबत, सक्षम प्राधिकारी शासन आहे. त्यानुसार शासनास आवश्यक असलेली माहिती सादर करावयाची असल्याने, नियतकालिक बदल्यांच्या संदर्भात अधिनस्त कार्यालयातील प्रादेशिक कार्यालय प्रमुखांनी शासन अधिसूचना दिनांक २५.५.२००६ मधील मार्गदर्शक तत्वानुसार अधिक संदर्भासाठी आणि अचुकतेसाठी त्यांच्या अभिलेखानुसार तीन वर्षापेक्षा जास्त एकाच ठिकाणी कार्यरत असणाऱ्या गट-अ आणि गट-ब अधिकाऱ्यांची माहिती दि.३१ जानेवारी,२०२५ पर्यंत मुख्यालयास पाठवावी.

शासन निर्णय दि.९.४.२०१८ नुसार शासनस्तरावर करावयाच्या बदल्यांच्या दृष्टीने ज्यांना एका विभागामधून दुसऱ्या विभागामध्ये समुपदेशनाव्दारे बदली करावयाची असल्यास, गट-ब मधील अधिकाऱ्यांनी दि.३१ जानेवारी, २०२५ पर्यंत अर्ज विहित मार्गाने महासंचालनालयास सादर करावेत महासंचालनालयामार्फत शासनास सदर अर्ज पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतील. या मुदतीनंतर वर्षभरात प्राप्त होणाऱ्या कोणत्याही स्वरुपाच्या समुपदेशनाव्दारे बदली अर्जांचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

सदरचे परिपत्रक महासंचालनालयाच्या www.dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(हेमराज बागूल)
संचालक (माहिती)(प्रशासन)

प्रति,

१) सर्व संबंधित अधिकारी
२) संचालक,(माहिती), माहिती व जनसंपर्क, नागपूर-अमरावती विभाग,नागपूर
३) संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क, मराठवाडा विभाग-छत्रपती संभाजीनगर
४) उपसंचालक (माहिती) महाराष्ट्र परिचय केंद्र,नवी दिल्ली.
५) उपसंचालक (माहिती),विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई / नाशिक / पुणे / कोल्हापूर /अमरावती/लातूर
६) वरिष्ठ सहायक संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी-गोवा

कृ.मा.प.

**प्रत माहितीसाठी :-**

१. संचालक (माहिती/प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
२. संचालक.(माहिती)(वृत्त व जनसंपर्क),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक,(माहिती), माहिती व जनसंपर्क, नागपूर-अमरावती विभाग,नागपूर
४. संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क, मराठवाडा विभाग-औरंगाबाद
५. उपसंचालक (माहिती/प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
६. उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई.
७. उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
८. उपसंचालक (प्रदर्शने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
९. उपसंचालक (माहिती) महाराष्ट्र परिचय केंद्र,नवी दिल्ली.
१०. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
११. उपसंचालक (माहिती),विभागीय माहिती कार्यालय,कोकण विभाग,नवी मुंबई/नाशिक/पुणे/कोल्हापूर/अमरावती/लातूर
१२. वरिष्ठ सहायक संचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, पणजी-गोवा.
१३. वरिष्ठ सहायक संचालक (वृत्तचित्र शाखा) (प्रकाशने शाखा) (विभागीय संपर्क कक्ष) (महान्यूज)
१४. वरिष्ठ सहायक संचालक (आस्थापना) / (जाहिरात-प्रशासन)
१५. संशोधन अधिकारी, संशोधन शाखा
१६. सर्व जिल्हा माहिती अधिकारी (माहिती केंद्रासह)
१७. माहिती अधिकारी, उप माहिती कार्यालय, डहाणू/शिर्डी
१८. अधिपरिक्षक, पुस्तके व प्रकाशने, मुंबई
१९. सर्व कार्यासन प्रमुख, (तांत्रिक कक्षासह), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

**प्रत अग्रेषित :** १. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई-३२
२. उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, कार्या-मावज-२, मंत्रालय, मुंबई-३२.